बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – ११८ वा । वार रविवार दि ०८ फेब्रुवारी २०२६ आरएनआय एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । पोस्टल नं. एल.एस.बी/बीड आर.एन.पी–२६६/२०२६–२०२८ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 118 Monday 08 February 2026 - RNI : MAHMAR/2023/83965 -Postal No. L S.B/Beed / RNP-266/2026-2028 Price - 3 Rupees Pages 4

# सावरगाव वाळू घाटातील अवैध वाहतुकीचा भांडाफोड करत वाळू माफियांना प्रशासनाचा दणका; ७८ टिपरवर ठोठावला तब्बल ६ कोटींचा दंड!

सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
● संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४

## टिपर मालकांवरील कारवाई आदेशावरच थांबणार की गुन्हे दाखल होणार?

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ७८ टिपर मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असली, तरी यानंतरचा खरा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे, ही वाहतूक करणारे टिपर मालक फक्त दंड भरून मोकळे होणार का? महाखनिज प्रणालीतील जीपीएस डेटानुसार एका अधिकृत फेरीच्या नावाखाली अनेक अनधिकृत फेऱ्या मारल्याचे स्पष्ट झाले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर नियमभंग होत असताना वाहन मालकांना ही बाब माहिती नव्हती, असा दावा कितपत खरा आहे, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. टिपर मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करून वाहने जप्त केली जाणार का, की कारवाई कागदावरच सीमित राहणार याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# एकाच पावतीवर १२३ फेऱ्या होत असताना प्रशासन झोपेत होतं का?; ७८ टिपरवर ६ कोटी दंड म्हणजे आतापर्यंत लूट सुरू ठेवण्याची मूक परवानगीच होती का?


अवैध वाळू वाहतुकीसाठी टिप्परांचा नंगानाच; छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, अहिल्यानगरसह इतर जिल्ह्यात वाळू भरून हायवा राजरोस धावत असताना एकही टिप्पर कसा पकडला गेला नाही?


कलेक्टर साहेब, उघडा डोळे बघा नीट एकाच पावतीवर तीन टीप्पर धावू लागते, पाडळसिंगी टोलनाक्याचे सीसीटीव्ही तपासून सत्य उघड करा?

## सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातमीने उघडली अवैध वाळू साखळी; सावरगाव वाळू टेंडर बंद, जीपीएस डेटाने माफियांचे धाबे दणाणले

गेवराई, (आरंभ वृत्तसेवा):– बीड जिल्ह्यात कोल्हापूरच्या वाळू पावत्यांचा वापर करून गेवराई तालुक्यातून परजिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या माफियांवर अखेर बीडच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मोठा दणका दिला आहे. ७८ टिपर वाहनांवर तब्बल ६ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, सावरगाव येथील वादग्रस्त वाळू घाटाचे टेंडर तात्काळ बंद करण्यात आले आहे. महाखनिज प्रणालीतील जीपीएस डेटानुसार २८ जानेवारीपासून या टिपर वाहनांनी १२३ अनधिकृत फेऱ्या मारल्याचे स्पष्ट झाले आहे. एका अधिकृत फेरीच्या नावाखाली पाचपट अवैध वाळू उपसा केल्याचे सिद्ध झाल्याने प्रशासनाने दंडात्मक कारवाईचा बडागा उगारला आहे. सावरगाव वाळू घाटावर एकाच पावतीवर तीन–तीन टिपर वाळू भरली जात होती, वाळू गेवराई तालुक्यातून उचलली जात असताना पावत्या मात्र कोल्हापूर जिल्ह्याच्या वापरल्या जात होत्या, असा गंभीर प्रकार उघडकीस आला. या गैरप्रकाराची दखल घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

या प्रकरणात उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे अवैध वाहतूक करणाऱ्या टिपर वाहनांवर दंड ठोठावण्यात आला असून, टेंडरधारक आणि वाहन मालक प्रशासनाच्या रडारवर आले आहेत.

विशेष म्हणजे वाळू घाट सुरू होऊन काहीच दिवस झाले असताना मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू वाहतूक सुरू होती. छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, अहमदनगर यांसह इतर जिल्ह्यांत हायवा आणि टिपर राजरोस धावत होते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणावर वाळू परजिल्ह्यात जात असताना एकही हायवा याआधी का पकडला गेला नाही? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.जिल्हा ओलांडून सुरू असलेली ही वाहतूक म्हणजेच वाळू लुटीची साखळी मोठी असल्याचे स्पष्ट झाले असून, या नंगानाचामागे नेमके कोणाचे आशीर्वाद होते, याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. कोट्यवधींचा महसूल बुडवणाऱ्या या पान २ वर...



### टेंडरधारक कारवाईच्या रडारवर; अवैध वाळू लुटीचा सूत्रधार कोण?

सावरगाव वाळू घाटातून सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीप्रकरणी आता थेट टेंडरधारक प्रशासनाच्या रडारवर आले आहेत. एकाच पावतीवर तीन–तीन टिपर वाळू भरणे, कोल्हापूरच्या पावत्यांवर गेवराईतून वाळू उचलणे आणि जिल्हा ओलांडून शेकडो फेऱ्या मारणे हा प्रकार टेंडरधारकांच्या माहितीशिवाय शक्यच नव्हता, असा ठाम संशय व्यक्त केला जात आहे.

जीपीएस नोंदी, पावत्यांचा डेटा आणि टोलनाक्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले, तर या अवैध वाळू साखळीचा मास्टरमाईंड थेट समोर येणार, असा दावा केला जात आहे. टेंडरधारकांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार का, की कारवाई केवळ दंडापुरतीच राहणार हा सवाल आता ऐरणीवर आला आहे.

### महसूल यंत्रणा कुचकामी ठरली का? तहसीलदार खोमणेंची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

सावरगाव वाळू घाटातून परजिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक सुरू असताना महसूल यंत्रणेची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. एकाच पावतीवर अनेक टिपर चालवले जात असतील, तर तहसीलदार संदीप खोमणे यांच्या अखत्यारितील यंत्रणेला याचा मागमूसही लागला नाही, हे कसे शक्य आहे? इतक्या मोठ्या प्रमाणावर शासनाचा महसूल बुडत असताना, केवळ वाहनांवर दंड लावून प्रशासन मोकळे होणार का, की जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार याकडे लक्ष लागले आहे. तहसीलदार संदीप खोमणे यांची चौकशी होणार का, की हा विषयही थंडावणार, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

# कर्जबाजारीपणातून तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



माजलगाव (आरंभ वृत्तसेवा):– इरला (ता. माजलगाव) येथील आसाराम मदन कुणेकर (वय ४० वर्षे) यांनी कर्जबाजारीपणा व कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या मानसिक तणावातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी उघडकीस आली. गावालगतच्या शिवारातील शेतात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली.

सकाळच्या सुमारास शेतात गेलेल्या नागरिकांना उसाच्या शेतात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ गावकऱ्यांना व माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्याला माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृत आसाराम कुणेकर यांच्यावर पाच मुलींच्या पालनपोषणाची जबाबदारी होती. मुलींचे शिक्षण, भविष्यातील लग्नकार्य तसेच शेती व घरगुती खर्चासाठी घेतलेले कर्ज यामुळे ते गेल्या काही दिवसांपासून तीव्र मानसिक तणावात होते. या सर्व कारणांच्या ओझ्याखाली दबून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे इरला गावात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# आ.धनंजय मुंडे यांच्यामुळेच वंजारवाडी धरणाला निधी मिळाला

**नवगण राजुरी सर्कलमधील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अखेर कायमस्वरूपी मार्गी प्रदीर्घ लढ्याला यश**
**आ. संदीप क्षीरसागर यांनी आयत्या पिठावर रेघोट्या ओढू नये– केशव तांदळे**

बीड (आरंभ वृत्तसेवा):– मौजे वंजारवाडी येथील लघु प्रकल्प दुरुस्ती , सांडवा तुटफुट झालेल्या भागास संधानकीय भिंत बांधणे तसेच पाणी पातळी दर्शक पट्टी बसविणे, मुख्य कालवा दुरुस्ती आणि पाणी वापर संस्था स्थापन करणे तसेच कॅनॉलच्या दुरुस्ती तसेच इतर कामासाठी १,०७,४५,६०० रुपये ची प्रशासनाची मंजुरी या कामासाठी मिळाली आहे . मागील पाच –सात वर्षापासून पासून पाठपुरावा चालू होता . कृषिमंत्री माननीय धनंजयजी मुंडे तसेचविद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार साहेब* या सर्वांच्या प्रयत्नाने अखेर या लढ्यास



यश मिळाले व नवगण राजुरी सर्कल मधील शेतकऱ्यांचा सिंचनांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे . वंजारवाडी , राजुरी , तिप्पटवाडी , रुई –लिंबा , मुर्शदपूर , तांदळवाडी , पिंपरगव्हान, शहाजहानपूर आदी क्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्हिजेएनटी सेलचे तालुकाध्यक्ष केशव तांदळे यांनी व्यक्त केले .

*बातमी सविस्तर : मौजे वंजारवाडी तालुका जिल्हा बीड येथील तलावास दुरुस्तीसाठी प्रशासनाने मंजुरी दिली असून या प्रस्तावाचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे आहे : १. वंजारवाडी लघु प्रकल्प, ता.जि. बीड येथे असुन सन १९६५ साली पूर्ण झालेला आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता २.८९३ दलघमी असून जिवंत साठवण क्षमता २.६४१ दलघमी आहे. धरणाची एकूण लांबी ५४१ मी. आहे. सांडव्याची एकूण लांबी ८ उमीटर असून प्रकल्पास एक मुख्य कालवे आहे. २. मागील ५ वर्षात १३९ हेक्टर महत्तम प्रत्यक्ष सिंचन झालेले आहे. ३. अधीक्षक अभियंता यांनी दि.२८/१२/२०२२ रोजी पान २ वर...

## संपादकीय...

### शेवटचे दर्शन आणि आयुष्यभराची हुरहूर...! प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नजरेत कसे होते अजितदादा?

आजची सकाळ नेहमीसारखीच उगवली होती. वरळी सी फेसवर चालताना समुद्राच्या लाटा, वाहणारा वारा आणि आजूबाजूची गर्दी, सगळं काही नेहमीसारखंच. पण अचानक समोरून उपमुख्यमंत्री अजितदादांचा कॅन्व्हाय वेगाने जाताना दिसला. गाडीत बसलेल्या अजितदादांचे अगदी पुसटसे दर्शन झाले, पण त्या क्षणी हे कळलं नाही की ते शेवटचं दर्शन ठरेल. आज त्या आठवणीकडे पाहताना मन कुठेतरी आतून ओढलं जातंय...

दादांशी माझा पहिला प्रत्यक्ष संपर्क कराड येथे डीवायएसी असताना आला. मी कराडला २०१२ साली पोलीस उपअधीक्षक म्हणून रुजू झालो. याच वेळी महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष सुरू झाले होते. त्यामुळे कराड येथे वर्षभर विविध शासकीय कार्यक्रमांची रेलचेल होती. त्या निमित्ताने उपमुख्यमंत्री म्हणून कराडला येणाऱ्या अजितदादांशी संवाद वाढत गेला. भेटीगाठींमधून ओळखच नाही तर त्यांचा स्वभाव, कामाविषयीची तळमळ आणि बारकाईची नजर हळूहळू उमगत गेली.

पुणे येथे २०१९ नंतरच्या तीन वर्षात विशेष शाखेचा पोलीस उपायुक्त म्हणून काम करत असताना कोरोनाचे अभूतपूर्व संकट उभे ठाकले होते. या अवचित संकटाने प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि आरोग्य व्यवस्था सगळेच तणावाखाली होते. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री या नात्याने अजितदादा न चुकता दर आठवड्याला नियमितपणे आढावा बैठक घेत असत. त्या बैठका केवळ औपचारिक नव्हत्या. बैठकीत उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांनी सुचविलेल्या अगदी छोट्या सूचनाही ते अत्यंत गांभीर्याने ऐकत, त्यावर चर्चा करत आणि अंमलबजावणीसाठी ठाम आग्रह धरत. त्यांच्या प्रत्येक निर्णयामागे जबाबदारीची जाणीव आणि लोकांच्या जीविताची काळजी स्पष्ट दिसायची. या काळात पोलीस दलाकडून होणाऱ्या समन्वयात माझी एक छोटीशी जबाबदारी होती. त्यामुळे पोलीस आयुक्तांसोबत प्रत्येक बैठकीला उपस्थित राहण्याचा योग आला. त्या काळात पोलिसांनी राबवलेल्या प्लाझ्मा दान या उपक्रमाचा समन्वयक म्हणून दादांनी माझे आवर्जून कौतुक केले. त्या शब्दांनी कामाचा उत्साह कितीतरी पटींनी वाढला होता.

धडाडीचे प्रशासक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादांसोबत अनेक प्रसंगांत चर्चा व संवाद करण्याची मला संधी मिळाली. त्यापैकी एक प्रसंग आठवतो. पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी व्हीआयपी दौऱ्यांसाठी कॅन्व्हायमध्ये वापरण्यात येणारी वेगवान वाहने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी मला दिली होती. त्यावेळी दादांनी सहजच मला विचारले, 'या वाहनांची किंमत किती?' मी सांगितले - 'सुमारे पंधरा ते वीस लाख रुपये.' क्षणभर थांबून त्यांनी पुन्हा प्रश्न केला 'आणि तुमचे आयुक्त वापरतात त्या गाडीची किंमत?...' 'दहा लाख रुपये...' असे मी सांगताच दादा मिस्कीलपणे हसले आणि म्हणाले, 'म्हणजे सीपींपेक्षा जास्त महाग गाडीतून तुमचा अंमलदार प्रवास करणार तर।' त्या एका वाक्यातून त्यांचा मिस्कील स्वभाव त्यांनी जागा ठेवल्याचे स्पष्ट जाणवत होते. असाच आणखी एक प्रसंग. सुनेत्रा पवार वहिनींनी नेहमीच घट्टे कुटुंबावर बहिणीची माया केली. पुणे पोलिस मुख्यालयाच्या नूतनीकरणाच्या उद्घाटनासाठी दादांना आमंत्रित केल्याचे मी वहिनींना सांगितले. त्या हसत म्हणाल्या, 'दादा बांधकामातील बारकावे आवर्जून पाहतात. काही उणे दिसले, तर तुमचे निश्चित कान टोचले जातील हे लक्षात ठेवा.' नेमके तसेच झाले. सहज लक्षातही न येणाऱ्या बांधकामातील काही उणिवा दादांनी दाखवून दिल्या. मात्र इमारत शंभर वर्षाहून अधिक जुनी असल्याने नूतनीकरणात आलेल्या मर्यादा सांगितल्यावर त्यांनी त्यावर समजूतदारपणे मार्गदर्शन केले. असे होते दादा!आजची सकाळ नेहमीसारखीच उगवली होती. वरळी सी फेसवर चालताना समुद्राच्या लाटा, वाहणारा वारा आणि आजूबाजूची गर्दी, सगळं काही नेहमीसारखंच. पण अचानक समोरून उपमुख्यमंत्री अजितदादांचा कॅन्व्हाय वेगाने जाताना दिसला. गाडीत बसलेल्या अजितदादांचे अगदी पुसटसे दर्शन झाले, पण त्या क्षणी हे कळलं नाही की ते शेवटचं दर्शन ठरेल. आज त्या आठवणीकडे पाहताना मन कुठेतरी आतून ओढलं जातंय...

दादांशी माझा पहिला प्रत्यक्ष संपर्क कराड येथे डीवायएसी असताना आला. मी कराडला २०१२ साली पोलीस उपअधीक्षक म्हणून रुजू झालो. याच वेळी महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष सुरू झाले होते. त्यामुळे कराड येथे वर्षभर विविध शासकीय कार्यक्रमांची रेलचेल होती. त्या निमित्ताने उपमुख्यमंत्री म्हणून कराडला येणाऱ्या अजितदादांशी संवाद वाढत गेला. भेटीगाठींमधून ओळखच नाही तर त्यांचा स्वभाव, कामाविषयीची तळमळ आणि बारकाईची नजर हळूहळू उमगत गेली.

पुणे येथे २०१९ नंतरच्या तीन वर्षात विशेष शाखेचा पोलीस उपायुक्त म्हणून काम करत असताना कोरोनाचे अभूतपूर्व संकट उभे ठाकले होते. या अवचित संकटाने प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि आरोग्य व्यवस्था सगळेच तणावाखाली होते. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री या नात्याने अजितदादा न चुकता दर आठवड्याला नियमितपणे आढावा बैठक घेत असत. त्या बैठका केवळ औपचारिक नव्हत्या. बैठकीत उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांनी सुचविलेल्या अगदी छोट्या सूचनाही ते अत्यंत गांभीर्याने ऐकत, त्यावर चर्चा करत आणि अंमलबजावणीसाठी ठाम आग्रह धरत.

# अपघात की निष्काळजीपणा? सर्व वाचकांना सप्रेम आदाब!

आपण सर्व सुखरूप असाल अशी मला आशा आहे. जर कोणाला कोणत्याही कारणामुळे अडचण किंवा चिंता असेल, तर अल्लाहच्या दरबारात हीच प्रार्थना आहे की, अल्लाह त्आला आपल्या सर्व चिंता आपल्या कृपेने दूर करो, आमीन.


वाचकांनो! आज मी आपल्यासमोर एक अतिशय संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर बोलू इच्छितो. मी एक कवी असल्यामुळे नेहमी गझल, कविता व मर्सियाच्या माध्यमातून माझे विचार मांडत आलो आहे परंतु आज माझ्या मनात आलेला विषय केवळ काव्याच्या माध्यमातून मांडणे अपुरे वाटले, म्हणून या विषयावर उघडपणे बोलणे आवश्यक वाटले.

आज मी विशेषतः त्या सर्व पालकांना उद्देशून बोलत आहे जे अपत्यसुखाने धन्य आहेत. अपत्य मिळणे ही अल्लाह त्आलाची एक महान देणगी आहे. आपण आपल्या मुलांची प्रत्येक किमतीवर काळजी घेतो, त्यांच्या भवितव्याबद्दल सदैव चिंतित असतो परंतु अनेकदा अज्ञान किंवा निष्काळजीपणामुळे आपण आपल्या मुलांना त्या अत्यावश्यक गोष्टी शिकवत नाही ज्या त्यांच्या जीवनाच्या सुरक्षेसाठी फार महत्त्वाच्या ठरू शकतात.

आपण रोज टीव्ही आणि वर्तमानपत्रांमधून अशा बातम्या पाहतो व ऐकतो, ज्यामध्ये निष्पाप मुलांचे प्राण जातात, उदा. – विजेचा धक्का बसणे, छतावरून खाली पडणे, रस्त्यावर वाहनाची धडक बसणे, घरातील गॅस, स्टोव्ह किंवा पाणी गरम करण्याच्या यंत्रांमुळे होणारे अपघात. विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की, या सर्व अपघातांना जबाबदार केवळ मुलेच असतात का? की कुठेतरी आपण पालकही त्यासाठी जबाबदार असतो?

वाचकांनो! मुले निरागस व अज्ञानी असतात. त्यांना योग्य शिक्षण व संस्कार देणे ही पालकांची मूलभूत जबाबदारी आहे. जर आपण वेळेत त्यांना योग्य मार्गदर्शन केले, तर अनेक अपघातांपासून आपण आपल्या मुलांचे संरक्षण करू शकतो. मी आपणा सर्व पालकांना नम्र विनंती करतो की, सर्वप्रथम आपल्या व्यस्त वेळेतून थोडा वेळ काढून घरातील धोकादायक वस्तूंविषयी आपल्या मुलांना माहिती द्या. घरात कोणत्या वस्तू धोकादायक आहेत, कोणत्या गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे, एखादी वस्तू वापरणे आवश्यक असेल तर ती कशी वापरावी, हे त्यांना समजावून सांगा. मुलांना घराच्या छतावर नेऊन तेथे असणाऱ्या संभाव्य धोक्यांची माहिती द्या. बाथरूममधील पाणी गरम करण्याची साधने आणि विद्युत उपकरणांबद्दल त्यांना समजावून सांगा. थोडक्यात, घरातील प्रत्येक धोकादायक गोष्टीची त्यांना जाणीव करून द्या, जेणेकरून कोणती गोष्ट कशी वापरायची आणि कशापासून दूर राहायचे हे त्यांना समजेल. घरानंतर आपली जबाबदारी आहे की, आपण मुलांना रस्त्यावरील धोक्यांचीही जाणीव करून द्यावी. उदा. – रस्त्यावर चालताना कोणत्या बाजूने चालावे, रस्ता ओलांडताना उजवी–डावी बाजू पाहणे का आवश्यक आहे, सायकल चालवताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी. या सर्व गोष्टी केवळ तोंडी न सांगता, प्रत्यक्ष त्यांना सोबत घेऊन दाखवा व शिकवा. असे केल्याने आपण आपले एक महत्त्वाचे कर्तव्य पूर्ण करू आणि आपल्या मुलांना अपघाती मृत्यूपासून वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू. वाचकांनो! हे खरे आहे की मृत्यूची वेळ आणि क्षण निश्चित असतो परंतु आपल्या प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहू अलैही व सल्लम यांनी आपले प्राण सुरक्षित ठेवण्याचा आदेश दिला आहे. म्हणूनच आपल्यावर हे कर्तव्य आहे की, आपण स्वतःच्या आणि आपल्या अपत्यांच्या सुरक्षेसाठी सर्व शक्य उपाययोजना कराव्यात. वरील सर्व बाबी अत्यंत संवेदनशील व महत्त्वाच्या आहेत. मी सर्व पालक आणि संरक्षकांना मनापासून आवाहन करतो की, त्वरित या खबरदारीच्या उपाययोजनांवर अंमल करा आणि आपल्या निष्पाप मुलांचे जीवन सुरक्षित करा.


अल्लाह त्आलाकडे हीच प्रार्थना आहे की, तो आपले आणि आपल्या मुलांचे अपघाती मृत्यूपासून संरक्षण करो, आमीन.



लेखन – आसिफ़ आलम
सहशिक्षक, बीड.
संपर्क – ७०२०९३५७६२

## बोगस राजमा बियाणे देऊन अंबाजोगाईच्या व्यापाऱ्याला १३ लाखांचा गंडा; साताऱ्याच्या ६ जणांवर गुन्हा

अंबाजोगाई: राजमा बियाणे पुरवठा करण्याच्या नावाखाली अंबाजोगाई येथील एका बियाणे व्यापाऱ्याची १२ लाख ८० हजार २०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात साताऱ्यातील 'येस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'च्या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई येथील सुयश प्रेमचंद मुथा (रा. गुरुवार पेठ, अंबाजोगाई) हे बियाणे व्यवसायाचे काम पाहतात. जुलै २०२५ मध्ये साताऱ्याच्या 'येस फ्रेश फार्मर प्रोड्युसर कंपनी'चे संचालक संजय बाबासाहेब भगत आणि ओंकार संजय भगत यांनी मुथा यांची भेट घेऊन त्यांना राजमा बियाण्याचे उच्च दर्जाचे नमुने दाखवले होते. त्यानुसार मुथा यांनी २१ जुलै २०२५ रोजी एकूण ८५ टन राजमा खरेदीचा करार केला आणि आरटीजीएसद्वारे वेळोवेळी रक्कम जमा केली.

करारानुसार ठरलेला माल तपासण्यासाठी मुथा साताऱ्याला गेले असता, तिथे दाखवल्याप्रमाणे चांगल्या दर्जाचा माल उपलब्ध नव्हता. तडजोड म्हणून त्यांनी २५ टनाची नवीन ऑर्डर दिली आणि एकूण २६ लाख ३१ हजार रुपये जमा केले. मात्र, आरोपींनी ३० ऑगस्ट २०२५ रोजी केवळ १२ टन माल पाठवला, जो अत्यंत निकृष्ट दर्जाचा होता. त्यामध्ये भेसळ, माती आणि पेरणीसाठी अयोग्य साहित्य मोठ्या प्रमाणात होते. उर्वरित मालासाठी किंवा पैसे परत मिळवण्यासाठी मुथा यांनी वारंवार संपर्क केला असता, आरोपींनी पैसे देण्यास नकार दिला आणि अर्वाच्य भाषेत उत्तरे दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सुयश मुथा यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी संजय बाबासाहेब भगत, ओंकार संजय भगत, अरविंद सोपान विधाते, सारीका सोमनाथ शिंदे, बालुताई सोमनाथ जगताप आणि बालकृष्ण पंढरीनाथ चव्हाण या ६ संचालकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**आईच्या कुशीत आहे माझे अस्तित्व,**
**बापाच्या छायेत आहे माझे**
**वास्तव, आई आहे मायेचा सागर,**
**बाप आहे छायेचा**
**वलय ,आई बापाची**
**तुलना मी करू कशी,**
**दोघांमुळेच आहे माझे**
**अस्तित्व,**
**सागराप्रमाणे अपार**
**माया आहे माझ्या**
**आईची ,बापाच्या**
**मायेची गुपित अंत**
**काही मिळेना,**
**बापाच्या छायेखाली आहे स्वर्गाचे**
**सुख, समजेना आजच्या पोराले आई**
**बाप म्हणून, दोघांमुळेच आहे माझे**
**अस्तित्व, कळणार नाही कुणा आई**
**बापाची माया, लेकराच्या सुखातच**
**आहे त्यांची मोहमाया, कळायला हवे**
**होते आई आणि बाबा, दुसऱ्याचे**
**ऐकून सोडतात मोहमाया, म्हणून**
**दोघांमुळेच आहे माझे अस्तित्व, आस**
**आहे विजय च्या मनी फक्त, करा**
**सेवा आई बापाची इथेच आहे स्वर्ग.**



**कवी : विजय धाईजे**
**माजलगाव**

पान १ वरून..

**सावरगाव वाळू घाटातील अवैध वाहतुकीचा भांडाफोड करत वाळू माफियांना प्रशासनाचा दणका; ७८ टिपरवर ठोठावला तब्बल ६ कोटींचा दंड!**

प्रकरणामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले असून, आगामी काळात दंडाची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संपूर्ण गेवराई तालुक्याचे लक्ष आता पुढील कारवाईकडे लागले आहे.

-----------------

**आ.धनंजय मुंडे यांच्यामुळेच वंजारवाडी धरणाला निधी मिळाला**

क्षेत्रीय पाहणी केली असून निरिक्षण टिप्पणी प्रस्तावात जोडलेली आहे . हे काम प्रस्तावित करण्याचे कारण प्रकल्प सांडव्याचे काम कमकुवत झालेले आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात गळती होत आहे. धरणाच्या पुच्छ भागाच्या उजव्या बाजूस मार्गदर्शक भिंतीस तडे गेलेले आहेत तसेच काही प्रमाणात तुटफुट झालेली आहे. त्यामुळे प्रस्तावित कामे पुढीलप्रमाणे : गळती होणा-या जागी जॅकेटींग प्रस्तावित आहे. डाव्या कडेस स्थित सांडव्याच्या खालील बाजूस र्त्रीींळपस व विभाजक भिंतीस झेळपींळपस व उेळिपस प्रस्तावित आहे. तुटफुट झालेल्या भागास संधानकीय भिंत बांधणे तसेच पाणी पातळी दर्शक पट्टी बसविणे, मुख्य कालवा दुरुस्ती आणि पाणी वापर संस्था स्थापन करणे इ. कामे प्रस्तावित आहेत. धरण भिंत सुस्थितीत येईल. कालवा बांधकामातून होणारी गळती थांबेल व पाण्याचा वापर सिंचनासाठी होईल. मुख्य कालवा दुरुस्त होवून प्रवाही सिंचन राबविणे शक्य होईल. प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची सखोल छाननी व्हावी व ते अचूक असावेत, या करिता महामंडळ कार्यालयाने त्रयस्त यंत्रणा म्हणून सुप्रमा प्रस्ताव छाननी समितीची स्थापना केलेली आहे. त्यानुसार प्रस्तुत अंदाजपत्रकाबाबत दि.०३/११/२०२३ रोजी महामंडळ कार्यालयात बैठक आयोजित करून महामंडळ स्तरावरील छाननी समिती मार्फत छाननी करण्यात आलेली आहे. सदर बैठकीतील मुद्यांचे अनुपालन संदर्भपत्र क्र.५ नुसार प्राप्त झाले आहे. शासन निर्णय दि.२७/११/२०१८ मधील निर्देशांनुसार, नियामक मंडळाच्या आगामी ८२ व्या बैठकीत मंजूर करावयाच्या प्राधान्यक्रमात सदर कामाचा समावेश करण्यात आला आहे.

शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ मधील परिच्छेद (ख), कार्यप्रकार २) (अ) व कार्यप्रकार २) (ब) मध्ये, अनुक्रमे विशेष दुरुस्ती आणि विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रस्तावित करावयाच्या कामांच्या प्राधान्यक्रमासाठी निकष दिलेले आहेत. सदर कामामुळे सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे. तसेच अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे दि. १८/०१/२०१८ च्या पत्रातील निर्देशानुसार, अंदाजपत्रकातील छाननी यादी १ ते २९ मुद्दे आणि अद्ययावत भाग-२, प्रपत्र-३ व कामांची यादी प्रमाणित करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व कार्यकारी संचालक यांच्या स्वाक्षरीनिशी प्रस्तावासह सोबत सादर करण्यात येत आहेत. उपरोक्त तपशिलाच्या अनुषंगाने, वंजारवाडी लघु प्रकल्प ता. बीड, जि. बीड या प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती कामाचे रु.१,०७,४५,६०० (जलसंपदा विभाग / सां.बा.वि. सन २०२२-२३ दरसुची वर आधारीत) किमतीचे अंदाजपत्रक महामंडळ कार्यालयाच्या शिफारशीसह प्रशासकीय मान्यतेस्तव सोबत सादर करण्यात येत आहे.नवगण राजुरी सर्कल मधील शेतकऱ्यांचा सिंचनांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे . वंजारवाडी , राजुरी , तिप्पटवाडी , रुई -लिंबा , मुर्शदपूर , तांदळवाडी , पिंपरगव्हान, शहाजहानपूर आदी क्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे तसेच स्व.अजित दादा पवार यांचे उर्वरीत स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार वहिनी व बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजयजी मुंडे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने राजुरी जिल्हा परिषद सर्कलचा सर्वांगीण विकास करू असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्हिजेएनटी सेलचे तालुकाध्यक्ष केशव तांदळे* यांनी व्यक्त केले

## हौसिंग सोसायट्यांना अमर्याद स्वातंत्र्य नाही

नवी दिल्ली : हौसिंग सोसायट्यांना (गृहनिर्माण संस्था) स्वत:चे व्यवहार व्यवस्थापित करण्याचे स्वातंत्र्य नक्कीच आहे; परंतु ते स्वातंत्र्य अमर्याद नाही. सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सभासदत्वाबाबतचा निर्णय घेण्यास नकार दिल्यास किंवा प्रदीर्घ काळ असा निर्णय प्रलंबित ठेवल्यास वैधानिक संस्था किंवा सरकारी अधिकारी त्या प्रकरणात हस्तक्षेप करू शकतात असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.



मुंबईतील मालबोरो हाऊस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडमधील एका प्रकरणावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. संबंधित सदनिकाधारकांना सोसायटीने सभासदत्व देण्यास विलंब केला होता. सदनिकाधारकांनी सुरुवातीला गृहनिर्माण संस्थेकडे सभासदत्वासाठी अर्ज केला होता. मात्र, संस्थेकडून प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०' अंतर्गत विभागीय सहनिबंधकांकडे धाव घेतली.

उच्च न्यायालयाने रद्द केला होता सहनिबंधकांचा आदेश

सहनिबंधकांनी कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना सभासदत्व देण्याचे आदेश दिले होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने हा आदेश रद्द केला होता. कोणाला सभासद करून घ्यावे, याचा अधिकार केवळ गृहनिर्माण संस्थेलाच आहे असा तर्क उच्च न्यायालयाने दिला होता. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

पान ४ वरून..

**सुकळी पुनर्वसनाचा प्रश्न पेटला! मावेजा आणि नागरी सुविधांसाठी**

आहे. शासनाच्या या दिरंगाईमुळे सुकळी येथील सामान्य नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आंदोलनाचा मार्ग:

येत्या ०८ फेब्रुवारीपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास ०९ फेब्रुवारीपासून सर्व सुकळी ग्रामस्थ गुणवती लहू पाटबंधारे प्रकल्पाच्या भिंतीवर आमरण उपोषणास बसणार आहेत. या आंदोलना दरम्यान कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भवल्यास त्याला जलसंपदा विभाग आणि संबंधित प्रशासन पूर्णतः जबाबदार राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, मुख्य अभियंता (छत्रपती संभाजीनगर), खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, आमदार प्रकाश दादा सोळंके आणि पोलीस प्रशासनाला माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

-------------------

**आंदोलन कर्ते स्वाभिमानीचे शेख खिजर, जयदेव शिगणे यांना**

दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणा-या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिका-यांना एक महिण्याच्या आत तीसरी नोटीस देऊन आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन दिलेले आसतांना दिलेल्या वेळेचा अर्धा कालावधी ऊलटत आलेला आसतांना देखील काहीच हालचाली दिसुन येत नसल्याने तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे व ग्रामविकास अधिकारी मुसळे हे आंदोलकांचा जिव घेण्याच्या मनस्थितित! आसल्याच्या ऊदगार वाचक प्रतिक्रिया तलवाडा गाव परिसरात ऐकावयास मिळत आहेत.

----------------

**अंबाजोगाईच्या लोकनेत्याची 'पेनकिलर्स'मधील प्रेरणादायी संघर्षगाथा !**

अथकव्याऐवजी नेहमीच हसू दिसतं. शारीरिक वेदना कितीही असल्या तरी एखाद्या गरजू व्यक्तीचा प्रश्न सुटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारं समाधान काकाजींसाठी कोणत्याही औषधापेक्षा प्रभावी ठरतं. औषधांच्या डोसपेक्षा लोकांचे आशीर्वाद आणि विश्वास हीच त्यांची खरी ऊर्जा आहे. दुसऱ्याचं दुःख दूर करण्यातच स्वतःचं सुख मानणारा असा लोकप्रतिनिधी आजच्या राजकारणात दुर्मिळ होत चालला आहे. नंदकिशोर मुंदडा यांचा प्रवास हा केवळ एका नगराध्यक्षाचा नाही, तर तो ऋषितुल्य त्याग, संयम आणि सेवाभावाचा आहे. अंबाजोगाईच्या मातीशी असलेलं ऋण फेडण्यासाठी त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य जनतेच्या सेवेस अर्पण केलं आहे. त्यांच्या या संघर्षातून आणि निस्वार्थ सेवेतून आजची पिढी नक्कीच प्रेरणा घेईल, यात शंका नाही.

-------------------

**स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिराचे आयोजन**

रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. आपण दिलेले रक्त संकटाच्या वेळी अनेकांचे प्राण वाचवू शकते. रक्तपेढ्यांमध्ये नेहमीच रक्ताची टंचाई असते, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठी धावपळ करावी लागते. अनेक वेळा रक्त न मिळाल्याने दुर्दैवी घटना घडतात. अशा परिस्थितीत रक्तदान करून गरजू रुग्णांना मदत करण्याची संधी युवा मंचने उपलब्ध करून दिली आहे, असे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्व. अमोल गलधर युवा मंचचे पदाधिकारी शंकर वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सुरज कदम, सचिन आगवान, करन वायभट, संतोष शिंदे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी गणेश रोटे, संतोष गायकवाड, सतीश गायकवाड यांनी रक्तसंकलन केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी दत्ता झोडगे, ज्योत्स्ना शिंदे, सीमा हिंदोळे यांच्यासह अ‍ॅड. गणेश वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, रामचंद्र मुळे, अक्षय येडे, गणेश घाडगे, ओंकार पवार, उमेश थोरात, बबलू आबदार, पप्पू थोरात, रोहित तागड, केशव गिरे, विजय वाणी, जीवन मुळे आदी मान्यवर उपस्थित होते

-------------------

**कडा येथे सोमवारपासुन महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ**

सांगता सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल आणि त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाईल. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी महेश गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, श्रीकृष्ण गणेश मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ आणि समस्त कडा ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन श्री महेश मंदिर ट्रस्ट व आयोजकांनी केले आहे.

# त्याग, सहनशीलता व स्त्रीशक्तीचे सर्वोच्च प्रतीक म्हणेज माता रमाई-आयु सरिता खेमाडे

बीड (आरंभ वृत्तसेवा):- धम्मदीप बुद्ध विहार, बलभीम नगर, शिवाजीनगर बीड येथे आयोजित त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२९ व्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून आयु सरिता खेमाडे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आयु हेमा वडमारे, पंचफुला वाघमारे, रमाबाई सोनवणे, सुजाता वाघमारे, अशा धनवे,यांची उपस्थिती होती सर्व प्रथम उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प हार घालून अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीप धुपाने पूजन करण्यात आले त्यानंतर आलेल्या मान्यवरांची महिला मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर अदिती धनवे अंजली विशाल वडमारे अंजली तेजस वडमारे सुजाता वाघमारे आशा धनवे यांनी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जीवन चरित्रावर आपले मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर अध्यक्षीय समारोपात आयुष्यमती सरिता खेमाडे यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाल्या त्यागमूर्ती माता रमाई या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यानी घर, कुटुंब आणि समाजसेवेत मोलाची साथ देणारी व्यक्तिमत्त्व आहे. अवघ्या ९ व्या वर्षी विवाह झाल्यापासून ते २७ मे १९३५ रोजी निधन होईपर्यंत, त्यांनी अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत उपासमार सहन करून चार पोटची लेकरं गमावून डॉ.बाबासाहेबांना शिकण्यासाठी व



समाजकार्यासाठी प्रोत्साहन दिले. ही त्या समर्पणाची भावना आजच्या स्त्रीने समजून घेणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण परिस्थितीत हालाखीचे दिवस घालवले. माता रमाई या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये डॉ. भीमराव आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी रामो यांना समर्पित केले. असे मोलाचे मार्गदर्शन केले त्यानंतर शौर्या आर्केस्ट्रा बीड च्या ऑर्गनायझर शकुंतला ससाने मॅडम व ड. चंद्रमुनी वीर, रमेश जावळे यांनी भीम गीतांचा तसेच त्यागमूर्ती माता रमाई यांच्या गीतांचा प्रबोधनातून प्रचार आणि प्रसार करून त्याग मूर्ती माता रमाई डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र विविध गीत सुमधुर आवाजात गाऊन जमलेल्या अनुयायांना मंत्रमुग्ध केले त्यानंतर शेवटी सरनात्तयने कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ड. तेजस वडमारे यांनी केले व भोजनदान करण्यात आले व सायंकाळी भव्य दिव्य आशी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक राधाताई साळवे, माया वडमारे, कुसुम साळवे, आशाबाई खेमाडे, आशाबाई भालेराव,आम्रपाली वडमारे, राणी लांडगे, सोनाली सकपाळ,दीपाताई सारणीकर, अर्चना जाधव,प्रीती जाधव, वर्षा खेमाडे, शिवकन्या खेमाडे, उषा जाधव, क्रांती धनवे,शीला साळवे, राणी साळवे, जानवी वाघमारे, कोमल वाघमारे, साखराबाई वाघमारे,काशीबाई गायकवाड, मीरा खेमाडे, सुधा सोनवणे, शितल साबळे,सोनाली अंकुटे, छाया जोगदंड, आचल वडमारी,स्वाती वडमारे, जयश्री वडमारे, सुवर्णा वाघमारे, जयश्री गवळी, नंदिनी वडमारे, किरण वडमारे, निवृत्ती वाघमारे, विशाल वडमारे, दिलीप गवळी, बन्सी वाघमारे, सिद्धार्थ वडमारे, डी. जी वानखेडे,आर्यन साळवे, जय जाधव, राज जाधव, ज्ञानेश्वर इंगळे, नागेश साळवे, नितीन वाघमारे, सचिन वाघमारे, गौतम खेमाडे,राजू धनवे, संजय धनवे, करण वडमारे, प्रेम जोगदंड, सेनापती वडमारे व परिसरातील सर्व बांधव उपस्थित होते.

# सोयाबीन खरेदीला १२ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ; १२ लाख टनांचे उद्दिष्ट गाठण्याचे सरकारसमोर मोठे आव्हान!

मुंबई: राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने हमीभावाने सोयाबीन खरेदीला आता १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. महाराष्ट्र सरकारने १८ लाख ५० हजार टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, प्रत्यक्षात आतापर्यंत केवळ ६ लाख टनांपर्यंतच खरेदी होऊ शकली आहे. खुल्या बाजारात सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा जास्त झाल्यामुळे शेतकरी सरकारी केंद्रांकडे पाठ फिरवत असून, उर्वरित ९ दिवसांत १२ लाख टनांचे लक्ष्य गाठणे हे सरकारसाठी मोठे आव्हान ठरत आहे.



खरेदी केंद्रांची संथ गती आणि शेतकऱ्यांची पाठ केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी १८ लाख ५० हजार टन खरेदीचे उद्दिष्ट दिले आहे. यासाठी 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या दोन संस्थांच्या माध्यमातून १,०६८ केंद्रांना मंजुरी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ ९३४ केंद्रांवरच खरेदी सुरू झाली. ही केंद्रे उशिराने सुरू झाल्यामुळे अनेक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी आधीच आपला माल हमीभावापेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांना विकला. आतापर्यंत राज्यातील २ लाख ३९ हजार ३३६ शेतकऱ्यांकडून ६ लाख ३ हजार ३२१ टन सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. बाजारातील वाढते दर आणि आव्हाने सोयाबीनचा अधिकृत हमीभाव ५ हजार ३२८ रुपये इतका आहे. मात्र, सध्या खुल्या बाजारात सोयाबीनचे दर या हमीभावाच्या पुढे गेले आहेत. त्यामुळे शेतकरी आता सरकारी केंद्रांवर रांगेत उभे राहण्याऐवजी थेट व्यापाऱ्यांना माल विकणे पसंत करत आहेत. आता खरेदीसाठी केवळ ९ दिवस शिल्लक असून, या अल्प कालावधीत १२ लाख टनांची मोठी खरेदी करणे तांत्रिकदृष्ट्या कठीण दिसत आहे.

# जगन्नाथराव पवळ यांच्याकडून मुक्त पत्रकारितेचा गौरव

## ज्येष्ठ उच्चशिक्षिताकडून सन्मान म्हणजे लोकमान्यतेची मोहर – एस.एम.युसूफ

बीड (आरंभ वृत्तसेवा):- शहरातील न्यू संजय मेडिकल चे संचालक फार्मासिस्ट ड. जगन्नाथराव पवळ यांनी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांना पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांच्या मुक्त पत्रकारितेचा गौरव केला. याप्रसंगी ज्येष्ठ उच्चशिक्षिताकडून सन्मान म्हणजे माझ्या लेखणीवर लोकमान्यतेची मोहर असल्याची भावनात्मक प्रतिक्रिया मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड शहरातील रहिवासी असलेले एस.एम.युसूफ़ गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने मुक्त पत्रकारिता करीत आहेत. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांच्या कार्याला एक तप नुकतेच पूर्ण झाले आहे. या निमित्ताने फार्मासिस्ट ड. जगन्नाथराव पवळ यांनी त्यांना आपल्या न्यू संजय मेडिकल स्टोअर्स मध्ये बोलावून शाल व पुष्पगुच्छ देत हृदयी सत्कार करत म्हटले की, कोणत्याही क्षेत्रात कुठलीही अपेक्षा न ठेवता फक्त समाजासाठी झिजणे सोपे नाही आणि युसूफ़ हे गेल्या बारा



वर्षांपासून सामाजिक समस्यांवर, प्रश्नांवर निस्वार्थपणे सातत्यपूर्ण कार्य करत आहेत. ही बाब बीड शहरच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्याकरिता गौरवास्पद आहे म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव केला

# यूजीसी नेट परिक्षेत रत्नदीप चोपडे यशस्वी

सिरसाळा (आरंभ वृत्तसेवा):- यूजीसी नेट म्हणजेच विद्यापीठ अनुदान आयोग-राष्ट्रीय पात्रता परीक्षेत परळी तालुक्यातील सिरसाळा येथील रत्नदीप परमेश्वर चोपडे हा विद्यार्थ्याने यश संपादन केले आहे. यूजीसी नेट २०२५ परिक्षेचा निकाल नुकाताच काही दिवसापुर्वी घोषीत झाला यात सिरसाळ्यातील रत्नदीप चोपडे इतिहास ह्या विषयात सदरील परिक्षेत ९४ % घेऊन उत्तीर्ण झाला आहे. रत्नदीप चोपडे हा शालेय जीवनापासून आभ्यासू व जिज्ञासू वृत्तीचा आहे. वर्ग १० वी / १२ वी बोर्ड परिक्षेत देखील चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झाला होता. त्याने मिळवलेल्या यशा बद्दल सर्व स्तरातून त्याचे



अभिनंदन होत आहे. हि भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये 'सहायक प्राध्यापक' आणि 'ज्युनिअर रिसर्च फेलोशिप' (जीआरएफ) साठी पात्रता ठरवणारी एक राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा आहे. या परिक्षे साठी मान्यताप्राप्त विद्यापीठातून संबंधित विषयात ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक असते. (एससी/एसटी/ओबीसी/पीडब्लूडी उमेदवारांसाठी ५०% गुण आवश्यक असतात, 'सहायक प्राध्यापक' पदासाठी कोणतीही वयोमर्यादा नाही, परंतु 'जेआरएफ' साठी उच्च वयोमर्यादा साधारणत ३० वर्षे असते,राखीव प्रवर्गासाठी सवलत लागू आहे.

# थकीत देयके निकाली काढा- आत्माराम वाव्हळ

बीड (आरंभ वृत्तसेवा):- मागिल काही वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके निधी अभावी शासनाने निकाली काढले नाहीत. या थकीत बिलासाठी तत्काळ निधी उपलब्ध करून देत थकित बिले लवकरच म्हणजे या वर्षी निकाली काढावेत अशी मागणी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके बाकी आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ही थकित देयके शासनाने निकाली काढले नाही, दरवर्षी थकीत बिल टाकले जाते सन २०२४-२५ मध्ये डायरेक्टर लेवलला गेलेले परंतु निधी अभावी बरेच बिले रिजेक्ट करण्यात आले, परत थकीत बिल टाकण्यासाठी सूचना दिल्या, सन २०२५-२६ मध्ये पुन्हा एकदा थकीत देयके सादर केली परंतु संपूर्ण महाराष्ट्रात बऱ्याच कर्मचाऱ्यांचे थकीत देयके बाकी आहेत. सर्व कर्मचाऱ्यांनी वेतन पथक कार्यालयात थकीत देयके सादर केले, संबंधित कार्यालय थकीत देयके चेक करून पुढे पाठवणार आहे, परंतु त्यांना कालावधी कमी असल्यामुळे आम्हाला आमचे बिल रिजेक्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने महाराष्ट्रातील वेतन पथक कार्यालयाला बिल चेक करण्यासाठी जास्त (वेळ) कालावधी द्यावा जेणेकरून सर्व कर्मचाऱ्यांचे बिल व्यवस्थित चेक करून पुढे पाठवले जाईल, सर्व थकीत देयके शासनाने याच वर्षात निकाली काढावे. त्या साठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून देत या वर्षात या हेडचे संपूर्ण थकीत देयके निकाली काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.




**बीड : मिलिया बॉईज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य अब्दुल सत्तार सर हे मक्का मदीना होऊन उंमरा करून आले असता त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करताना समाजसेवक मुसाखान पठाण, फिरोज खान पठाण, व अकबर सिद्दिकी दिसत आहेत...**

# समाजसेविका शकिला पठाण यांची मुतवल्ली विंगच्या मराठवाडा अध्यक्षपदी निवड

## ऑल इंडिया उलेमा बोर्ड मुतवल्ली विंगच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर (आरंभ वृत्तसेवा):- सामाजिक क्षेत्रात गेल्या ३५ वर्षापासून मराठवाडा उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या छत्रपती संभाजी नगर येथील शकिला अयुब पठाण यांची ऑल इंडिया उलेमा बोर्ड च्या मराठवाडा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.. याबाबत अधिक माहिती अशी की, ऑल इंडिया उलेमा बोर्ड मुतवल्ली विंगचे राष्ट्रीय अध्यक्ष जनाब शेख फैसल मुजावर यांच्या अध्यक्षतेखाली मोतीवाला नगर, इंटरनॅशनल हॉस्पिटलसमोर, सिडको येथे शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता मुतवल्ली विंगच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात प्रसिद्ध समाजसेविका मोहतरमा जाकिरा नाजे खान पठाण ऊर्फ शकीला पठाण यांची मुतवल्ली विंग मराठवाडा



अध्यक्षा म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच औरंगाबाद शहर अध्यक्षपदी मांडविया सीमा मोहम्मद शकील, तर उपाध्यक्षपदी अहमद मोहम्मद अली खान यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शेख फैसल मुजावर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन गुलपोशी करण्यात आली. यावेळी शेख फैसल मुजावर यांनी सांगितले की, भारतातील विशेषतः महाराष्ट्र व औरंगाबाद येथील वक्फ जमिनींच्या संरक्षणासाठी ऑल इंडिया उलेमा बोर्डाने मुतवल्ली विंगची स्थापना केली आहे. रेल्वे खात्याच्या मालमत्तेनंतर देशात वक्फ मालमत्ता दुसऱ्या क्रमांकावर आहे. या जमिनींचा योग्य वापर झाल्यास देशातील कोणताही मुस्लिम नागरिक भुकेला किंवा बेरोजगार राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वक्फ बोर्डाच्या जमिनींचे संरक्षण, बेकायदेशीर अतिक्रमण हटवणे तसेच मुतवल्ली, ट्रस्टी, मदरसे, आशूरखाने, कब्रस्तान, चिल्ला, दर्गा, मशिदी, यतीमखाने आदी वक्फ प्रकरणांमध्ये येणाऱ्या अडचणी लोकशाही मार्गाने सोडवून न्याय मिळवून देण्याचे काम मुतवल्ली विंग करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शेख फैसल मुजावर यांची गुलपोशी करून आभार मानले. या कार्यक्रमास उलेमा बोर्डाचे प्रदेशाध्यक्ष (वक्फ विंग) शेख आसिफ, जिल्हाध्यक्ष अशरफ पठाण, सैयद मुजीब, सिद्धार्थ ढाले, सैय्यद याकूब मुतवल्ली, अय्यूब पठाण, नाजे पठाण, अनीस रामपुरे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळसंबर येथे कुस्ती स्पर्धेसाठी राणा डोईफोडे यांच्याकडून चांदीची गदा बक्षीस

नेकनूर (आरंभ वृत्तसेवा):- बीड तालुक्यातील कळसंबर येथे मेडची आई देवीच्या यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेत पाली जिल्हा परिषदेचे सदस्य राणा डोईफोडे यांनी मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी चांदीची गदा या स्वरूपात बक्षीस दिले.त्यांच्या या योगदानामुळे स्थानिक कुस्तीपटूंमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. कुस्ती या पारंपारिक खेळाला राजाश्रय मिळावा आणि ग्रामीण भागातून दर्जेदार पैलवान घडावेत, या उद्देशाने राणा डोईफोडे यांनी ही मदत केली आहे. कुस्ती हा आपल्या मातीतील खेळ आहे, तो टिकला पाहिजे आणि वाढला पाहिजे,अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. मेडची आई देवीची



यात्रा कळसंबर गावची उज्वल आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. ही परंपरा जतन करण्यासाठी आणि ती अधिक वृद्धिंगत करण्यासाठी आपण

सदैव प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही देखील त्यांनी ग्रामस्थांना दिली. राणा डोईफोडे यांच्या या दातृत्वामुळे आणि सामाजिक कार्याबद्दल कळसंबर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# सुकळी पुनर्वसनाचा प्रश्न पेटला! मावेजा आणि नागरी सुविधांसाठी ग्रामस्थांचा एल्गार; ९ फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाचा इशारा

**प्रशासकीय दिरंगाईचा फटका; 'विशेष बाब' म्हणून पुनर्वसन होऊनही ग्रामस्थ लाभांपासून वंचित; गुणवती लहू प्रकल्पाच्या भिंतीवर आंदोलनाचे संकेत**

सिरसाळा (आरंभ वृत्तसेवा):– धारूर तालुक्यातील मौजे सुकळी येथील पुनर्वसित ग्रामस्थांच्या संयमाचा अंत झाला असून, जुन्या गावातील मूल्यांकनानुसार मावेजा आणि मूलभूत नागरी सुविधा न मिळाल्यास येत्या ९ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण करण्याचा अंतिम इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना पाठवण्यात आले असून, या आंदोलनामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. काय आहे मुख्य मागणी?



सुकळी गाव विशेष बाब म्हणून पूर्णतः पुनर्वसित करण्यात आले आहे. शासन निर्णय आणि महामंडळाच्या विविध पत्रांनुसार, ग्रामस्थांना त्यांच्या जुन्या घरांच्या मूल्यांकनानुसार आर्थिक मावेजा मिळणे आणि नवीन पुनर्वसन ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, वीज, प्रशासकीय इमारत आणि सांडपाण्याची व्यवस्था (नाली–गटार) यांसारख्या नागरी सुविधा पुरवणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात अद्याप कोणताही ठोस लाभ न मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाची दिरंगाई आणि ग्रामस्थांचे हाल: ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वारंवार पाठपुरावा आणि आश्वासने देऊनही प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवत आहे. रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने पुनर्वसित ठिकाणी राहणे अशक्य झाले पान २ वर...

# आंदोलन कर्ते स्वाभिमानीचे शेख खिजर, जयदेव शिंगणे यांना प्रशासक चलवा चालावं करू करू लागले?

**तिसरी नोटीस बेकायदेशीर अतिक्रमण वाल्यांना कधी देणार?**
**जिल्ह्यात मोठे आंदोलन होऊन काही नुकसान झाले तर तेव्हा जाग येणार का?**







तलवाड़ा (आरंभ वृत्तसेवा):– गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटचे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे हे पदाधिकारी गेल्या वर्षभरा पासुन सातत्याने विविध आंदोलन करत असुन संबधित प्रशासनाने आंदोलनाची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद देत आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीसा दिलेल्या आसतांना तीसरी नोटीस देण्यास विलंब का? आसा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत असून दिनांक २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक पान २ वर...

**अंबाजोगाईत विविध विभागांचा महा–आढावा**

# केज मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. नमिता मुंदडा यांचा 'ॲक्शन प्लॅन'!

अंबाजोगाई (आरंभ वृत्तसेवा):– केज मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्व सरकारी विभागांमध्ये समन्वय असणे ही काळाची गरज आहे. याच समन्वयातून जनतेचे प्रश्न अधिक जलद आणि प्रभावीपणे सुटतील, असा विश्वास आमदार नमिता मुंदडा यांनी व्यक्त केला. अंबाजोगाई येथे पंचायत समिती अंतर्गत असलेल्या सर्व विभागांची सविस्तर आढावा बैठक नुकतीच पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

या बैठकीला अंबाजोगाईचे नगराध्यक्ष आदरणीय नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. महत्त्वाच्या योजनांवर सखोल चर्चा या महा–आढावा बैठकीत मतदारसंघातील प्रलंबित कामे आणि सुरू असलेल्या योजनांचा बारकाईने आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा झाली: पाणी व स्वच्छता: 'जल जीवन मिशन' अंतर्गत सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती आणि पाणीपुरवठा विभागातील अडचणी. पायाभूत सुविधा: जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि लघु पाटबंधारे विभागाची विकासकामे. जनहितकारी योजना: घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या अडचणी आणि रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी. शिक्षण व आरोग्य: शाळांच्या पायाभूत सुविधा आणि आरोग्य केंद्रांमधील सेवांचा दर्जा सुधारण्यावर भर. कृषी व पशुसंवर्धन: शेतकरी आणि पशुपालकांसाठी असलेल्या योजनांचा आढावा. महिला व बालकल्याण: महिला सक्षमीकरण आणि बालकांच्या पोषणासंदर्भातील कामांची पाहणी.



जनतेचे प्रश्न सोडवताना प्रशासकीय दिरंगाई होऊ नये. सर्व विभागांनी एकमेकांशी समन्वय ठेवून काम केल्यास विकासाची गंगा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल.

– आ. नमिता मुंदडा

अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती

या बैठकीस अंबाजोगाईचे गटविकास अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच पंचायत समितीचा कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. बैठकीत उपस्थित केलेल्या तांत्रिक अडचणींवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

# स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिराचे आयोजन



लिंबागणेश (आरंभ वृत्तसेवा):– स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त आज रविवार दि. ०८ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्व. अमोल गलधर युवा मंच, लिंबागणेश यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

स्व. अमोल गलधर यांनी बीड रेल्वेसाठी उभारलेला संघर्ष, टॉवरवर चढून केलेले शोले स्टाईल आंदोलन, आकाशवाणी बंद पाडण्याचे आंदोलन, तसेच तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे दहन करून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवण्याचे धाडसी आंदोलन यामुळे ते सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. यासोबतच बीड जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे, असे मत तंटामुक्ती समिती अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले. स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत स्व. अमोल गलधर युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पान २ वर...

*सुखासीनतेचा त्याग अन् जनसेवेचा ध्यास*

# अंबाजोगाईच्या लोकनेत्याची 'पेनकिलर्स'मधील प्रेरणादायी संघर्षगाथा!

केज (आरंभ वृत्तसेवा):– आयुष्य कसं असावं? हा प्रश्न विचारला की बहुतांश लोक सुख, पैसा, उत्तम आरोग्य, कुटुंबाचा आधार आणि मित्रांचा सहवास यालाच प्राधान्य देतात. मात्र अंबाजोगाईच्या भूमीत जन्मलेल्या आणि वाढलेल्या नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांनी या सर्व सुखावर पाणी सोडत केवळ जनसेवेलाच आपलं अंतिम ध्येय मानलं. स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता, वेदनांशी दोन हात करत सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी झटणाऱ्या या लोकनेत्याची जीवनगाथा सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. एकेकाळी नंदकिशोर मुंदडा यांचं आयुष्य अत्यंत सुखासीन होतं. व्यवसायात यश, व्यायामामुळे सुदृढ शरीरयष्टी, पर्यटनाची आवड, मित्रमंडळींसोबत चित्रपट आणि



सामाजिक आयुष्याचा आनंद–सगळं काही सुरळीत सुरू होत. मात्र अंबाजोगाई–केज मतदारसंघातील सामान्य नागरिकांच्या अडचणी, त्यांच्या डोळ्यांतलं दुःख आणि असहाय्यपणा पाहून त्यांच्या मनात एक प्रश्न ठाण मांडून बसला याच एका प्रश्नाने त्यांच्या आयुष्याची दिशा बदलली आणि त्यांनी जनसेवेचा कठीण, पण समाधान देणारा मार्ग स्वीकारला. लोकसेवेचा मार्ग स्वीकारताना काकाजींनी स्वतःच्या वैयक्तिक आयुष्याला दुय्यम स्थान दिलं. सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत नागरिकांचे प्रश्न, विकासकामांचा पाठपुरावा, प्रशासनाशी सातत्याने संपर्क–या सगळ्यात त्यांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष केलं. परिणामतः आज त्यांना तीव्र शारीरिक वेदनांना सामोरं जावं लागत आहे. वेदना नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेकदा पेनकिलर्स आणि स्टिरॉइड्सचा आधार घ्यावा लागतो. मात्र या सगळ्या त्रासांनंतरही जनतेसमोर जाताना त्यांच्या चेहऱ्यावर पान २ वर...

# आ.नमिता मुंदडा यांनी येवता–पन्हाळवाडी रस्त्याचे भाग्य उजळवले!

***मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून 'हॉटमिक्स' कामाचा धडाका***



केज (आरंभ वृत्तसेवा):– केज तालुक्यातील येवता ते पन्हाळवाडी रस्त्याची दुरवस्था अनेक वर्षांपासून ग्रामस्थांसाठी त्रासदायके ठरली होती. आमदार नमितात्ताई अक्षय मुंदडा आणि जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडांच्या विशेष प्रयत्नांमुळे मुख्यमंत्री योजनेअंतर्गत या रस्त्याचे 'हॉटमिक्स' डांबरीकरण काम ग्रामसडक त्साहात सुरू झाले आहे. मुंदडा परिवाराने या रस्त्यासाठी निधी मिळवून, कामाच्या ठिकाणी दर्जाची काटेकोर अंमलबजावणी करून, रस्त्याची टिकाऊपणा आणि प्रवासाचा वेळ वाचवण्यावर विशेष लक्ष दिले आहे. येवता परिसराची महत्त्वाची बाजारपेठ असल्याने हा रस्ता पन्हाळवाडीसह आजूबाजूच्या वाड्या–वस्त्यांतील शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारपेठेत सहज पोहोचवण्यास मदत करेल. दर्जेदार कामामुळे ग्रामस्थांनी मुंदडा दांपत्याचे आणि काकाजींचे आभार मानले आहेत. आ. नमिता मुंदडा यांनी यावेळी सांगितले, लोकांच्या सोयीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. येवता–पन्हाळवाडी रस्ता हा या भागाच्या विकासाची नवी वाहिनी ठरेल.

# कडा येथे सोमवारपासुन महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ

**बबन महाराज बहिरवाल यांची रंगणार श्रीराम कथा**




आष्टी (आंरभ वृत्तसेवा ) आष्टी तालुक्यातील कडा येथील महेशनगर येथे श्री महेश मंदिर ट्रस्टच्या वतीने १२ व्या महाशिवरात्री महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा भक्तिमय सोहळा पार पडणार असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष, मदन महाराज संस्थान व सेवाश्रम) यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ६ ते ९ या वेळेत रंगणारी 'श्रीराम कथा' हे आहे. या कथेसाठी ह.भ.प. धनंजय महाराज कदम, ह.भ.प. अनिकेत महाराज चांगुणे, ह.भ.प. कृष्णा महाराज खांडगे आणि ह.भ.प. हंसराज महाराज मगर हे कलाकार साथसंगत करणार आहेत. सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ९ विष्णू सहस्त्रनाम आणि ९:३० ते १ या वेळेत श्री शिवलीलामृत ग्रंथ पारायण पार पडेल. तसेच दुपारी २:३० ते ५ श्री संत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ९ ते पहाटे ४ या वेळेत जागर असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. महोत्सवाची पान २ वर...




**बीड : आज जिल्हा रुग्णालय बीड या ठिकाणी स्वर्गीय अमोल भैया गलधर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, स्वतः स्वप्निल भैया गलधर यांनी रक्तदान करून स्वर्गीय अमोल भैया गलधर यांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले या प्रसंगी अशोक दादा ढोले पाटील, प्रकाश तावरे, सह आधी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT